दै. सत्यप्रभा दि. 06.02.2025

## १६ डिझेल पंप, ६१ तराफे, १ जेसीबी, २०० ब्रास वाळूसाठा जप्त

# वाळूमाफियांवर पोलिसांचा हातोडा



एसपी अबिनाश कुमार उतरले मैदानात

**नांदेड, दि. ५ :** जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात सुरू असलेल्या अवैध वाळू उपसा आणि वाहतुकीला लगाम घालण्यासाठी आता खुद्द पोलीस अधीक्षक मैदानात उतरले आहेत. पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी बुधवारी पहाटे रहाटीपासून ते पेनुरपर्यंत गोदावरी काठावर पाहणी करत अवैध वाळू उपसा करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली. या कारवाईत तब्बल १६ डिझेल पंप जप्त करण्यात आले आहेत. २०० ब्रास वाळूसाठाही जप्त केला असून ६० तराफे आणि एक जेसीबीही पकडण्यात आली आहे. या कारवाईत दोन कोटींचा मुद्देमाल जप्त करण्यात आल्याची माहिती त्यांनी स्वतः दिली. गोदावरी काठावरील रहाटीपासून ते पेनुरपर्यंत गेल्या अनेक वर्षांपासून मोठ्या प्रमाणात अवैध वाळू उपसा सुरू आहे. या वाळू उपसावर कोणतेही नियंत्रण राहिले नाही. यामध्ये महसूल विभागाने परवानगी दिलेले अधिकृत रेती घाटही आहेत. परवानगी दिलेल्या वाळू डेपो या ठिकाणीही मोठ्या प्रमाणात नियमांची पायमल्ली करून अवैध वाळू उपसा केला जातो. वाळू डेपोमध्ये वाळू न साठवता थेट ती बाजारात विक्री केली जात आहे. स्थानिक तसेच वरिष्ठ महसूल अधिकाऱ्यांना हाताशी धरून मनमुरादपणे हा कारभार सुरूच आहे. याला आळा घालण्यासाठी पोलिसांनी गेल्या महिनाभरापासून कारवाईला सुरुवात केली आहे. बुधवारी झालेल्या मोठ्या धाडसत्रात खुद्द पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार हेही सहभागी झाले होते.

मंगळवारी रात्रीपासूनच या धाडसत्राचे नियोजन करण्यात आले होते. मोठ्या फौजफाट्यासह अवैध वाळूचा उपसा करणाऱ्याविरुद्ध कारवाई करण्यात आली. या कारवाईत १६ डिझेल पंप जप्त करण्यात आले आहेत. ६० तराफे, एक जेसीबी, २०० ब्रास वाळू साठा असा जवळपास दोन कोटींचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. याबाबतची पंचनामा प्रक्रिया अजूनही सुरूच आहे. जिल्ह्यात कुठेही अवैध वाळू उपसा चालणार नाही, असा स्पष्ट इशारा अबिनाश कुमार यांनी दिला आहे. बुधवारी करण्यात आलेल्या कारवाईत उपविभागीय पोलीस अधिकारी सुशीलकुमार नायक, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय, नांदेड ग्रामीणचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्यासह इतर पोलीस अधिकारी, कर्मचाऱ्यांचा सहभाग होता.

### गुन्हेगारीचे प्रमाण वाढले

महसूल विभागाकडून वाळू उपसा आणि वाहतुकीसाठी परवानगी दिली जाते. मात्र, यामध्ये अनियमितता होत आहेत. झटपट श्रीमंत होण्यासाठी अनेक गुन्हेगारी वृत्तीचे लोक यामध्ये शिरले आहेत. परिणामी जिल्ह्यात गुन्हेगारीचे प्रमाणही वाढले आहे. हे गुन्हेगारी प्रमाण रोखण्यासाठी पोलिसांना आता कारवाई करावीच लागणार असल्याचे अबिनाश कुमार यांनी स्पष्ट केले.

### पोलीस सक्रिय राहणार

जिल्ह्यात वाळू उपसाचे प्रमाण यापुढे निश्चितच वाढणार असल्याची चिन्हे आहेत. याबाबतची तयारी मोठ्या प्रमाणात वाळूमाफियाकडून केली जात आहे.

या वाळूमाफियांना वेळीच ठेचले नाही तर यापुढेही असा अवैध वाळूउपसा तसेच वाहतूक जिल्ह्यात सुरू राहील. यातून गुन्हेगारीला मोठ्या प्रमाणात चालना मिळेल. त्यामुळे अवैध वाळू उपसा रोखण्यात पोलिसांची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे.

### 'महसूल'च्या कारवाईत तीन इंजिन जप्त

वाळू माफियासाठी मोकळे कुरण ठरलेल्या गोदावरी घाटातून अवैध वाळू उपसा करणाऱ्यांविरुद्ध मंगळवारी महसूल विभागाने कारवाईचा बडगा उगारला तर बुधवारी पोलीस पथक या घाटावर धडकले आहे. मंगळवारी महसूल विभागाने केलेल्या कारवाईत १२ लाखांचे तीन इंजिन जप्त करण्यात आले आहेत.